“बंजारा जमातीतील महिला सबलीकरणाचा समाजशास्त्रीय अभ्यास”
(विशेष संदर्भ : लातूर जिल्हा)

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड च्या
मानव्य विद्याशाखा अंतर्गत समाजशास्त्र विषयातील पीएच.डी.
पदवीसाठी सादर केलेला संशोधन आराखडा.**

:संशोधक :

कांबळे दत्ता दौलाजी
(एम.ए.समाजशास्त्र नेट, सेट.)

:मार्गदर्शक :

डॉ. बी.डी. पवार
संशोधन मार्गदर्शक तथा सहा. प्राध्यापक
समाजशास्त्र विभाग
भाई किशनराव देशमुख महाविद्यालय, चाकूर

:: संशोधन केंद्र ::

महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर

सन-2018

“बंजारा जमातीतील महिला सबलीकरणाचा एक समाजशास्त्रीय अभ्यास”
(विशेष संदर्भ : लातूर जिल्हा)

प्रस्तावना :-

भारतीय समाजात प्राचिन काळापासूनच स्त्रीला दुय्यम स्थान दिले आहे. प्राचिनकाळ, मध्ययुगीन काळानुसार स्त्रियांच्या सामाजिक, आर्थिक स्थितीत सातत्याने बदल झालेला आहे. आर्थिक उत्पन्नात पुरूषाच्या बरोबर स्त्रियांचेही फार मोठे योगदान आहे. उच्चवर्गीयांच्या तुलनेत आजही भटक्या जमातीतील स्त्रियांचे कुटूंबासाठी आर्थिक योगदान महत्वपूर्ण असून सुध्दा आजच्या समाज व्यवस्थेमध्ये आजही स्त्रिला सर्वस्वी पुरूषावरच अवलंबून रहावे लागते. आजही स्त्री शैक्षणिक, आर्थिक सामाजीक , राजकीय बाबतीत म्हणावे तेवढ्या प्रमाणात सक्षम झालेली दिसून येत नाही.

भटक्या जमातीतील एक प्रमुख जमात म्हणून बंजारा जमातीकडे पाहिले जाते. बंजारा जमातीचा उल्लेख अति प्राचीन असून बंजारा जमातीची एक विशिष्ट संस्कृती पाहावयास मिळते. त्यांची रूढी, परंपरा, सण, उत्सव , लोकगीते, पोशाख वैशिष्टयेपूर्ण असे आहे. बंजारा ही जमात अनेक प्रांतात वेगवेगळ्या नावाने जसे की, गोर, लमाणी, लांबडा आदी नावाने ओळखली जाते. प्राचिन सिंधू संस्कृतीशी संबंधीत बंजारा संस्कृती भारतात पाहावयास मिळते. महाराष्ट्रात बंजारा, कर्नाटकात लमाणी आंध्रप्रदेशात लांबडा तर उत्तर प्रदेशात नायक अशा वेगवेगळया नावाने परिचीत आहेत. बंजारा जमात ही गायपुजक असून ही पारंपारीक पध्दीतीने गायीच्या पाठीवरून मिठ विकण्याचा व्यवसाय करत असे. बदलत्या काळानुसार आज ही बंजारा जमात शैक्षणिक, राजकिय, आर्थिक क्षेत्रात वेगवेगळया पदावर कार्यकरीत असली तरी विकासापासून वंचीत राहिली आहे.

बंजारा स्त्री अतिशय रूढीप्रिय स्त्री म्हणून ओळखली जाते बंजारा जमातातील स्त्रीयांच्या पोशाख, राहणीमान आजही वैशिष्टयेपूर्ण आहे. बंजारा जमातातील स्त्रीयांचा दर्जा बदलत्या काळानूसार बदलत आहे काय? याचा अभ्यास करण्यासाठी “बंजारा जमातीतील महिला सबलीकरण एक समाजशास्त्रीय अभ्यास” हा संशोधन विषय निवडला आहे. भारतीय

समाजातील प्रत्येक स्त्री शोषित, पिडीत, दुर्बल अशीच राहिली आहे. याला महाराष्ट्रातील बंजारा अपवाद नाही पारंपारीक पध्दतीने जीवन जगणाऱ्या बंजारा स्त्रीयांचे स्थान स्वातंत्र्याच्या नंतर आधुनिकीकरण, शिक्षण, पाश्चिमात्यकरण इतर संस्कृतीच्या प्रभावामुळे या स्त्रीयांचा दर्जा व राहणीमान बदलत आहे. आज ती सामाजीक, आर्थिक, शैक्षणिक, राजकिय क्षेत्रात सबल बनत आहेत का? याचा अभ्यास या संशोधनात करण्याचा प्रयत्न आहे.

या संशोधनात बंजारा जमातीची ऐतिहासीक पार्श्वभूमीचा अभ्यास करून बंजारा जमातातील महिलांची शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक, राजकिय स्थितीचा अभ्यास केला जानार आहे. त्याच बरोबर या जमातीतील स्त्रीयांच्या सर्व बाबतीत सबलीकरण होत आहे का? याचेही अध्ययन करण्याचा प्रयत्न करणार आहे. याच बरोबर भारत सरकार व महाराष्ट्र शासनाने भटक्या जमाती, महिला विकासासाठी कायदे ध्येय धोरणे, योजनांचा अभ्यास करून बंजारा जमातीतील महिला कितपत सबल झाल्या आहेत यासर्व घटकांच्या अभ्यासाअंती निष्कर्षा पर्यंत पोहचनार आहे.

साहित्य सर्वेक्षण आढावा :-

सदरील संशोधनात बंजारा जमातीतील वेगवेळ्या विषयावर झालेल्या संशोधनाचा आढावा घेण्यात येईल. जसे की, गणपत राठोड, 20 मे 2000 ''बीड जिले के बंजारा लोकगीतोंका अध्ययन'' या विषयावर संशोधन केलेले आहे. हे संशोधन हे डॉ. बाबाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापिठ औरंगाबाद येथे सादर केले आहे. प्रस्तुत संशोधनात बंजारा लोकगीतांचा अध्ययन केलेले आहे.Prabhakar Y. Ambekar-1985 The laman a community study, sociological Analysis, यांनीही बंजारा जमातीवर अध्ययन केलेले आहे. बंजारा जातीच्या अनुषंगाने असे काही महत्वपुर्ण संशोधन झालेले आहे. त्या संशोधनाचा आढावा घेवून.त्यासंशोधनापेक्षा प्रस्तुत संशोधन कसे वेगळे आहे हे दाखवण्याचा प्रयत्न केला जाईल.

संशोधनाचे महत्वः-

आजच्या आधुनिक युगात एकही क्षेत्र उरले नाही. की त्यात स्त्रीयांचा सहभाग नाही परंतू आजही स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदललेला नाही, स्त्री ही आजही म्हणावे तेवढया प्रमाणात सबल झाली नाही, सदरील संशोधन लातूर जिल्हयातील "बंजारा जमातीतील महिला सबलीकरण एक समाजशास्त्रीय अभ्यास" या विषयावर अध्ययन केले जाणार आहे. बंजारा जमातीतील महिला आजही विकासापासून वंचित आहे. महिला सबलीकरण च्या अनुशंगाने म्हणावे तेवढे संशोधन झाले नाही. जे झाले ते वेगवेगळ्या दृष्टीकोनातून काही भागपुरतेच मर्यादीत झालेल आहे. अशा स्वरुपाचे अद्ययन झाले नाही.संशोधन झाले असले तरी तोकडया प्रमाणात झाले आहे. हे संशोधन बंजारा जमातीतील महिलांना आर्थिक विकासाच्या दृष्टीकोनातून मार्गदर्शक ठरेल त्याच बरोबर बंजारा जमातीतील महिलांना सामाजिक, आर्थीक आणि राजकीय दृष्टीकोणातून सबल बनविण्यासाठी उपयुक्त ठरेल.

बंजारा जमातीतील महिलांना निर्णय क्षमतेचा विकास करण्यासाठी महत्वपूर्ण ठरेल तसेच सदरील संशोधन महिला सबलीकरणासाठी शासनाच्या उपाययोजना व ध्येयधोरणे ठरविण्यासाठी महत्वपूर्ण ठरेल.

समस्या व स्वरूप :

सदरील संशोधन हे लातूर जिल्हयातील बंजारा जमातीच्या दृष्टीकानातून असल्यामुळे लातूर जिल्हयातील बंजारा जमातीची पार्श्वभुमी तपासने महत्वाचे आहे. लातूर जिल्हयातील 2011 ची लोकसंख्या 2454196 आहे. पुरूषांची संख्या 1273140 आहे. तर स्त्रियांची संख्या 1181056 आहे. एकूण लोकसंख्येची घनता 343 पर स्केअर किलो मिटर आहे. या ठिकाणी साक्षरतेचे प्रमाण पुरूष 77.26 आहे तर स्त्री साक्षरतेचे प्रमाण 69.63 आहे. लिंगगुणोत्तराचे प्रमाण 1000 मागे पुरूष –स्त्रिया 928 आहे. या लातूर जिल्हयातील बंजारा जमातीची संख्या सांख्यिकी विभागात चौकशी केली असता भटक्या बंजारा जमातीची संख्या उपलब्ध नसल्याचे सांगण्यात आले आहे, सदरील संशोधनाच्या अभ्यासाअंती बंजारा जमातीतील लोकसंख्येची माहिती मिळविण्यात येईल.

संशोधनाची उदिष्टये :

1. महिला सबलीकरणाची संकल्पना जाणून घेवून बंजारा जमातीतील स्त्रियांची स्थितीचा अभ्यास करणे.
2. बंजारा जमातीतील महिलांच्या सामाजिक व शैक्षणिक स्थितीचा अभ्यास करणे.
3. बंजारा जमातीतील महिलांच्या राजकिय व आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.
4. बंजारा जमातीतील स्त्रीयांचे कौटुंबिक , वैवाहिक, धार्मिक व सांस्कृतिक जीवनाचे वर्णन करणे.
5. भटक्या विमुक्तासाठी असलेल्या शासकीय योजनांच्या संबंधी लाभाचा आढावा घेणे.
6. बंजारा जमातीतील स्त्रीयाचे प्रश्न व समस्या जाणून घेणे.
7. बंजारा जमातीतील महिला सबलीकरणाच्या दृष्टीकोन शास्त्रीय पध्दतीने माहिती संकलीत करणे, सदरील माहितीचे विश्लेशण करून निष्कर्ष काढणे.

गृहितकृत्ये :

1. बंजारा जमातीतील महिलांना लिंगभेदानुसार दुय्यम स्थान दिले जाते, त्यांच्यातील शिक्षणाचे प्रमाण कमी असून मुळात हा समाज सामाजिकदृष्टया मागास असल्याचे जानवते.
2. बंजारा जमातीतील महिलांचा समाजिक व आर्थिक दर्जा खालावलेला दिसून येतो.
3. बंजारा जमातातील महिलांचे राजकिय क्षेत्रात प्रतिनीधीत्व अल्प प्रमाणात दिसून येते.
4. बंजारा जमातीतील महिलांचे शैक्षणिक प्रमाण कमी असल्याचे जानवते.
5. बंजारा जमातीतील महिलांना शासकीय योजना, सामाजिक कायदे, या बातचे अज्ञान असल्याचे जानवते.
6. बंजारा स्त्रीवर प्रथा, परंपरा जातीचा पगडा असल्यामुळे कुटूंबातील निर्णय निर्धारणात तिला दुय्यम स्थान असल्याचे दिसून येते.

संशोधन पध्दती :

सामाजिक संशाधन करीत असताना संशोधन पध्दतीची भमिका महत्वाची असते. शास्त्रीय संशोधन केल्यामुळे समस्यांची उकल करुण क्रमबध्द पध्दतीने अध्यन केल्यामुळे तथ्य संकलित करता येतात नविन तथ्याचा शोघ घेऊन संशोधनाचा हेतू सफल होतो. याच दृष्टीकोणातून‘‘बंजारा जमातीतील महिला सबलीकरण एक समाजशास्त्रीय अभ्यास’’ या विषयाचे अध्ययन करुन नविन तथ्याचा शोध घेऊन मिळवलेल्या माहितीच्या आधारे विश्लेषन केले जाणार आहे.

संशोधन आराखडा :

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी वर्णनात्मक संशोधन आराखडयाचा उपयोग करण्यात येणार आहे. समस्येबाबत वास्तविक तथ्यांचा आधारावर वर्णनात्मक संशोधन आराखडा घ्यावयाचा आहे.

समाजशास्त्रात सामाजिक घटकांचा आणि वास्तव परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी संशोधन आराखडयाचे कार्य महत्वपूर्ण आहे. वर्णनात्मक संशोधन आराखडयाचा वापर करून समुहाच्या स्थितीचे व वैशिष्टयाचे वर्णन करता येईल. स्त्रियांचा आर्थीक व सामाजिक दर्जा अभ्यासता येईल.

नमुना निवड :

प्रस्तुत संशोधन कार्यात लातूर जिल्हयातील प्रत्येक तालुक्याला समान न्याय देण्याच्या दृष्टीने प्रत्येक तालुक्यातील 20 कुटूंब या प्रमाणे एकुण 10 तालुक्यातून लोकसंख्येच्या प्रमाणात 200 कुटूंबातील महिलांचा अभ्यास करण्याचा माझा मानस आहे. प्रस्तुत संशोधनात नमुन्याची निवड गैर संभाव्य नमुना निवड प्रकारातील सहेतुक नमुना निवड पध्दतीने केला जाईल अध्ययन क्षेत्र जरी मर्यादीत असले तरी अभ्यास हा सर्व समावेशक स्वरूपाचा असेल.

तथ्य संकलनाचे स्त्रोत :

प्रस्तुत संशोधनात अध्ययनासाठी पुढील प्रमुख स्त्रोताचा वापर करून विश्वसनीय माहिती प्राप्त करण्याचा प्रयत्न केला जाईल.

1) प्राथमिक स्त्रोतः

उपयुक्त व उपलब्ध असलेली माहिती मिळविण्यासाठी लातूर जिल्हयातील 10 तालुक्यातील बंजारा जमातातील स्त्रियांना प्रत्यक्ष भेटी देऊन त्यांच्याकडून मुलाखत अनूसूची भरून घेण्यात येतील. मुलाखत अनूसूची या तंत्राचा वापर करून महत्वपूर्ण माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला जाईल. काही ठिकाणी माहिती मिळण्याची शक्यता कमी असेल तर निरीक्षण तंत्राचा वापर करून उपयुक्त माहिती संकलीत केली जाईल.

2) दुय्यम स्त्रोतः

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी वापरण्यात येणारी माहिती ही प्रकाशित व अप्रकाशित या दोन्ही स्त्रोताचा उपयोग करण्यात येईल. वेगवेगळया स्त्री अभ्यास केंद्रांना भेटून व ग्रंथालयांना भेटी, विषयाच्या संदर्भातील संख्या, वर्तमानपत्रातील लेख, मासिके, साप्ताहिके, संदर्भग्रंथ, इंटरनेट सेवा इ. वापर करून वास्तविक माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला जाईल. माहितीचे विश्लेषण करून निष्कर्ष काढण्यात येतील.

3) तथ्य विश्लेषण :

संकलित केलेली माहिती (key) की आणि (coding) सांकेतीकरण करण्यात येईल. सांकेतीकरणाचे तक्ते, माहिती वर्गीकरण व विश्लेषण करण्यात येईल. दुय्यम स्त्रोताचा आधार घेऊन विश्लेषण करण्यात येईल. त्याचबरोबर आवश्यक त्या ठिकाणी आलेखांचा वापर केला जाईल. जेणे करून तूलनात्मक अभ्यास करून त्या मागील विविध घटकामधील कार्यकारण भाव शोधता येईल.

संशोधनाचा कालावधी :

प्रस्तूत संशोधन कार्य तीन वर्षाच्या कालावधीत पूर्ण करण्याचा प्रयत्न केला जाईल.

प्रकरण मांडणी :

प्रकरण पहिले- प्रस्तावना :

प्रस्तुत प्रकरणात बंजारा जमातीची ऐतिहासीक पार्श्वभूमी चा अभ्यास केला जाईल. महिला सबलीकरणाची संकल्पनेची मांडणी करण्यात येईल. भटक्या बंजारा जमातीतील स्त्रीयांची आर्थिक, सामाजिक स्थिती, त्यांच्या सामाजिक दर्जा तसेच आजपर्यंत स्त्रियांसंबंधी झालेल्या संशोधनाच्या अभ्यासावर आधरीत माहितीचे वर्णन, विश्लेषण करता येईल. महिला सबलीकरणामुळे स्त्रीयांची महिला सबलीकरणातील भूमिका स्पष्ट करण्यात येईल.

प्रकरण दुसरे- संशोधन पध्दती :

प्रस्तुत प्रकरणातून संशोधनासाठी वापरण्यात येणारी सामाजिक संशोधन पध्दतीची सविस्तर मांडणी करण्यात येईल. तसेच जाती-जमाती, भटक्या विमुक्त जमातीतील स्त्रिया संबंधी झालेल्या संशोधन साहित्याचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण तिसरे- वैयक्तिक माहिती :

प्रस्तुत प्रकरणात संशोधनासाठी वापरण्यात येणारी तथ्या संकलनाच्या आधारे बंजारा जमातीतील स्त्र्यांची वैवाहीक व अवैवाहीक स्थिती, बंजारा जमात, उपजात, शिक्षण, व्यवसाय, कुटूंबाचा प्रकार ,आर्थिक उत्पन्न या सर्वांचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण चौथे- बंजारा जमातीतील महिलांचे कौटुंबिक व धार्मीक जीवन :

या प्रकरणात प्राथमिक स्त्रोताच्या आधारे प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारावर माहितीचे विश्लेषण व त्याची मांडणी करण्यात येईल.

प्रकरण पाचवे- बंजारा जमातीतील शैक्षणिक , आर्थिक व राजकीय जीवन :

लातूर जिल्हयातील बंजारा जमातीतील साक्षरतेचे प्रमाण, शैक्षणिक प्रगती जाणून घेण्यासाठी तथ्या संकलीत केले जातील, शिक्षणातील अडअडचणी, शिक्षण घेताना केला जाणारा भेदभाव व मुलीचे शिक्षणात येणारे अडथळयांचा विश्लेषण केले जाणार आहे. तसेच बंजारा जमातीतील पारंपारीक व्यवसाय व आधुनीक व्यवसाय याचा आढावा घेवून आर्थिक स्थितीचा आढावा घेतला जाईल व राजकीय जिवनाचा ही आढावा घेतला जाईल.

प्रकरण सहावे- महिला सबलीकरणाची उपाययोजना :

भटक्या विमुक्तासाठी आणि बंजारा जमातातील स्त्रियांसाठी असलेल्या सामाजिक सवलती व कायद्याच्या आढावा घेतला जाईल. कायद्याविषयी ज्ञानाच्या अभ्यास, कायद्याविषयक जीवनात झालेला बदल, महाराष्ट्र शासन व केंद्र शासन यांच्या विविध योजना, योजनेमुळे मिळणारा लाभ यातून व्यक्त झालेले स्त्रियांचे मते यासंबंधीचे विवेचन संकलीत होईल व आढावा घेण्यात येईल.

प्रकरण सातवे – निष्कर्ष आणि शिफारशी

प्रस्तुत संशोधन अध्ययनातून माहितीच्या आधारे बंजारा जमातीतील स्त्रियांच्या समस्या, समाजजीवन, आर्थिक, लिंगभेदानुसार स्त्रियांना मिळणाऱ्या सामाजिक दर्जा कुटूंबात व समाजात मिळकतीचा दर्जा संबंधीचे विवेचन करून निष्कर्ष देण्यात येतील व योग्य ठिकाणी शिफारशी देण्यात येतील.

संदर्भग्रंथ सूची :-

1. चव्हाण एस. , दमाळ बंजारा जमातीची उत्पत्ती आणि विकास
2. चव्हाण पी., "बंजारा समाज दर्शन", संगत प्रकाशन नांदेड, जानेवारी 2005
3. जाधव वाय, "बंजारा जाती : समाज और संस्कृती" , वाणी प्रकाशन दरियागंज, नईदिल्ली

4. बी.पाटील, “बंजारा लोकांचा इतिहास”, बळीराम पाटील स्मारक समिती, यवतमाळ श्याम ब्रदर्स, सुभाष रोड नागरपूर 1973

5. राठोड एम., “गोर बंजारा वंशाचा इतिहास”, प्रकाशक सौलतादेवी भमसेन नाईक, कोपरी ठाणे-2005

6. शर्मा एस., “बंजारा संस्कृती, दक्षिण प्रकाशान”, गांधी बाजार हैद्राबाद

7. पिंगळे बी., “वनवासी व उपेक्षितजग”, अभिनव जीवन प्रकाशन, बीड, 1990

8. रूद्रवार यु., “महाराष्ट्राचे शिल्पकार वसंतराव नाईक”

9. पवार आर., “बंजारा लोकजीवन पध्दती”, कैलास पब्लीकेशन औरंगपूरा, औरंगाबाद 2005

10. डॉ. इरावती कर्वे, “मराठी लोकांची संस्कृती”, देशमुख आणि कंपनी, पुणे.1972

11. रामनाथ नामदेव चव्हाण, “भटक्या विमुक्तांचे अंतरंग”, सुगावा प्रकाशन, पुणे. 1995

12. ना.धो. कदम, “महाराष्ट्रातील भटका समाज संस्कृती, साहित्य प्रतिमा” प्रकाशन, पुणे. 1995

13. डॉ. शुभांगी गोटे, “महिला सबलीकरण स्वरूप व समस्या,” वरद पब्लिकेशन, औरंगाबाद. 2004

14. डॉ. बी.एम. कुऱ्हाडे, “शास्त्रीय संशोधन पध्दती”, पिंपळापुरे अँड कंपनी पब्लिशर्स, नागपूर.2011

15. डॉ. रामचंद्र भिसे, “भारतीय समाज एवंम महिला सशक्तीकरण”, विकास प्रकाशन, नागपूर. 2013

16. डॉ. प्रदिप आगलावे, “संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे”, विद्या प्रकाशन, नागपूर. 2000

17. P.N Majumdar (1961), Races and Cultures India, Asia Publication House, Bombay.

18. Mirmala Kumar Bose (1972), Some Indian Tribes, Naitonal Book Trust, New Delhi.

19. Shridhar V. Ketkar (1979), History of Cast in India, Cosmo Publication, New Delhi.

20. G.S. Ghurye (1963), The scheduled Tribes, Popular Prakashan, Bombay.

संशोधक

कांबळे दत्ता दौलाजी
एम.ए. समाजशास्त्र नेट, सेट

मार्गदर्शक

डॉ. बी.डी. पवार
संशोधन मार्गदर्शक तथा सहा, प्राध्यापक
समाजशास्त्र विभाग
भाई किशनराव देशमुख महाविद्यालय, चाकूर